MHKO050006752021

**नियमित दिवाणी दावा क्र. ४९/२०२१ मधील नि. ३१ खालील आदेश**

**सुभाष बाळासो उर्फ बाळू दरिबे विरुध्द मालूताई बाळासो उर्फ बाळू दरिबे वगैरे**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २अ ते क तर्फे अर्ज असा की, यातील वादीने प्रस्तुतचा दावा सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. त्याचे समन्स प्रतिवादी यांना फेब्रुवारी २०२१ रोजी लागू झाले होते. त्यानंतर दि. १२/०२/२०२१ रोजी प्रतिवादींना आपले म्हणणे मांडण्याकरीता तारीख नेमण्यात आली होती. त्यांनी सदर दिवशी वकिलपत्र देवून म्हणणे मांडणेसाठी मुदत घेतली आणि त्यानंतर कोव्हीड १९ च्या प्रादुर्भावामुळे त्यांना वकिलांना भेटून आवश्यक ती माहिती व कागदपत्रे देता आलेली नाहीत. कोव्हीड १९ च्या प्रादुर्भावामूळे न्यायालयीन कामकाज बंद ठेवणेत आला होता. त्यामूळे शासकीय कार्यालयाकडून कागदपत्रे मिळत नव्हती. सदरची कागदपत्रे ही अलीकडेच मिळाली असल्याने कैफियत दाखल करुन झालेला विलंब याकामी माफ करावा व प्रतिवादींनी जाणूनबुजून कैफियत देणेस कधीही टाळाटाळ केलेली नाही. विलंब माफ केल्यास वादीचे कोणतेही नूकसान होणार नाही. उलट न्यायदानास मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येण्यासारखे अपरिमित नूकसान होणार आहे. नैसर्गिक न्याय तत्वानूसार व लॉ ऑफ इक्वीटीनूसार प्रतिवादीची कैफियत कामात सामिल करुन घेणे गरजेचे आहे. तरी त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. वादी यांनी निशाणी ३४ वर आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानूसार यातील प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिलेला अर्ज खोटा व चुकीचा आहे. यातील प्रतिवादी क्र. १ व २ यांना फेब्रुवारी २०२१ रोजी समन्स/नोटीस लागू झाले होते. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ हे वकिलांमार्फत हजर झाले होते. तरीही त्यांनी

कैफियत व म्हणणे दिले नव्हते. मा. न्यायालयाने दि. २४/०३/२०२२ रोजी नो डब्ल्यूएस चा आदेश पारित केलेला आहे. असे असताना देखील प्रतिवादी यांनी त्यानंतर नेमलेल्या तारखेस कैफियत दिले नाही व त्यांना कैफियत देणेसाठी १ वर्ष ५ महिने २० दिवस इतका विलंब झालेला आहे. तसेच अर्जात प्रतिवादीने कोणतेही सफिशियंट कारण नमूद केलेले नाही. प्रतिवादीने केवळ कोवीड-१९ चे कारण नमूद केले आहे. हे खोटे व चूकीचे आहे व सदरील कारण हे ग्राहय धरता येणार नाही. त्यामूळे प्रतिवादी क्र. १ व २ यांना प्रत्येकी ३,०००/- खर्च करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. दाव्यातील अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, सदर दाव्यात प्रतिवादी यांना समन्स लागू झाले आहेत. त्यानंतर प्रतिवादी हे दाव्यात हजर झाले. परंतू त्यांनी कैफियत व निशाणी ५ करीता म्हणणे दाखल केले नाही. सदर समन्स फेब्रुवारी २०२१ रोजी लागू झाले असल्याने नियमाप्रमाणे ९० दिवसांचा कालावधी संपला आहे. परंतू सदरचे प्रकरण हे गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. करीता अर्जातील नमूद कारण विचारात घेवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. तसेच झालेल्या विलंबा करीता कॉस्ट लावणे न्यायोचित होईल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे-

## आदेश

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी रुपये २००/- इतकी कॉस्ट वादी यांना देण्यात यावी.

Digitally signed by MRUNMAYEE M CHOUDHARY
Date: 2022.08.23 17:21:17 +0530

**ठिकाण - इचलकरंजी** **(एम.एम.चौधरी )**
**दिनांक - २०/०८/२०२२** **४ थे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी.**